महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

**(महाराष्ट्र पोलीस राजपत्र विभागीय भाग ६- अ करिता)**

**क्र.पोमसं/४/१०(७)/लो.स.-२०२४-सपोनि.बदल्या/१३/२०२४,** **मुंबई, दि.: - २७/०२/२०२४**

**वाचा :-** १. महाराष्ट्र पोलीस अधिनियम - १९५१

२. मा.केंद्रीय निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.437/6/1/INST/ECI/FUNCT/ MCC/ 2023, दि.२१/१२/२०२३,

३. या कार्यालयाचे क्र.पोमसं/४/१०(७)/लो.स.-२०२४-सपोनि.बदल्या/१३/२०२४, दि. ३०/०१/२०२४ चे आदेश,

४. मा. मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे क्र.जीईएन-२०२४/प्र.क्र.१४१/२४/३३, दि. २२/०२/२०२४ चे पत्र,

५. पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांचे दि. २५/०२/२०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त

६. मा. मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे क्र. जीईएन-२०२३/प्र.क्र.७५१/२३/३३, दि. २७/०२/२०२४ चे पत्र

**-: आ दे श :-**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूका-२०२४ च्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये, मा.केंद्रीय निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचना / निर्देशांनुसार सर्व पोलीस आयुक्त व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक या घटक प्रमुखांकडून बदलीपात्र नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांची माहिती मागविण्यात आली होती. त्यानुसार सर्व संबंधीत घटक प्रमुखांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावातील माहितीची छाननी करुन छाननीअंती बदलीपात्र नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्याकरिता महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न (२) अन्वये, पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांनी मान्यता दिल्यानुसार, उपरोक्त संदर्भ क्र. ३ च्या आदेशान्वये एकुण १४ नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या.

२. तथापि, उपरोक्त संदर्भ क्र. ४ च्या पत्रान्वये, मा. मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी या कार्यालयास दिलेल्या सुचनांनुसार, या कार्यालयाचे संदर्भ क्र. ३ च्या आदेशान्वये ज्या १४ सहायक पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या, त्यांच्या बदलीकरिता संबंधित घटकांकडुन या कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे फेरतपासणी करण्यात आली. सदर फेरतपासणीअंती मा. मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी या कार्यालयास दिलेल्या सुचनांनुसार खालील तक्त्यात नमुद सहायक पोलीस निरीक्षक हे त्यांच्या घटकांत दि. २१/१२/२०२३ रोजी functional पदावर कार्यरत असल्याने त्यांची जिल्हाबाहय बदली करणे अभिप्रेत नसल्याने, खालील नमुद नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांची उपरोक्त संदर्भ क्र. ३ च्या आदेशान्वये करण्यात आलेली बदली रद्द करण्यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम - १९५१ मधील कलम- २२ न (२) अन्वये पोलीस आस्थापना मंडळ क्र. ०२ यांनी मान्यता दिल्यानुसार व सदरहु बदल्या रद्द करण्यास मा. मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी सहमती दर्शविल्यानुसार, खालील नमुद सहायक पोलीस निरीक्षकांची या कार्यालयाचे दि. ३०/०१/२०२४ च्या आदेशान्वये, रकाना क्र ०४ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी करण्यात आलेली बदली याव्दारे रद्द करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | नि:शस्त्र सपोनि. यांचे नाव | सध्याची नेमणुक | नविन नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १ | नानासो बाळु सावंत | सोलापूर शहर | औरंगाबाद परिक्षेत्र |
| २ | सत्यवान रामदास भुयारकर | अमरावती शहर | नागपूर शहर |

(संजीव कुमार सिंघल)
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरीता.

**प्रत,**

पोलीस आयुक्त, नागपूर शहर / अमरावती शहर / सोलापूर शहर

विशेष पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद परि.

२. उपरोक्त तक्त्यात रकाना क्र. ४ मधील नमुद घटक प्रमुखांनी या बदली आदेशाची प्रत संबंधीत नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक यांना तात्काळ बजावून त्यांना त्यांच्या पूर्वीच्या घटकात विनाविलंब कार्यमुक्त करावे. तसेच, सदर बदली आदेशाची प्रत त्यांना प्राप्त झाल्याबाबत त्यांची दिनांकासहीत स्वाक्षरी घ्यावी व ती पोच या कार्यालयास पाठवावी. बदली झालेल्या नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांना कार्यमुक्त करताना पर्यायी / बदलीवर येणाऱ्या नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांची वाट पाहू नये. तसेच, संबंधीत नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांना पदग्रहण अवधी न उपभोगता तात्काळ बदलीच्या ठिकाणी हजर होण्याचे लेखी निर्देश देखील द्यावेत. संबंधीत नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांना बदलीवर कार्यमुक्त केले नाही, तर त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत घटक प्रमुखांवर राहील. त्याचप्रमाणे बदली आदेशाधीन नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांना बदली ठिकाणी कार्यमुक्त करुनही ते त्यांच्या बदलीच्या घटकात विहित वेळेत हजर झाले नाहीत, तर ते शिस्तभंगविषयक कार्यवाहीस पात्र राहतील.

३. सदर बदलीच्या आदेशामुळे ज्या जागा रिक्त राहणार आहेत, त्या ठिकाणांचा कार्यभार संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकातील इतर नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांकडे तात्काळ सोपवावा.

४. बदलीवरील नियुक्तीच्या ठिकाणासंदर्भात मा.न्यायालयाचे अथवा मा.न्यायाधिकरणाचे स्थगिती आदेश असल्यास ते विचारात घेवून पुढील कार्यवाही करावी.

५. ज्या ठिकाणी स्थानिक निवडणूक संबंधाने आचारसंहिता लागू आहे, त्या ठिकाणांच्या अधिकाऱ्यांना आचारसंहिता समाप्त झाल्यानंतर तात्काळ कार्यमुक्त करावे.

६. मा.केंद्रीय निवडणूक आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे व या सूचनांचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७. बदलीवर हजर झालेल्या नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांना घटकांतर्गत पदस्थापना देताना कार्यकारी पदात नेमणुक द्यावयाची असल्यास मुळ जिल्हयात नेमणुक देण्यात येऊ नये. तसेच, मा.केंद्रीय निवडणूक आयोगाने दि.२१/१२/२०२३ व दि. २३/०२/२०२४ च्या पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन होणार नाही, याची संबंधीत घटक प्रमुखांनी नोंद घ्यावी.

८. सदरचे आदेश घटक कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे निर्गमित करण्यात येत असून त्यामध्ये काही त्रुटी राहिल्या असल्यास तसे या कार्यालयास कळवून पुढील आदेशाची वाट पहावी / काही अधिकाऱ्यांची तक्रार असल्या ास हया कार्यालयास त्वरित कळवावी.

९. बदली आदेशानंतर जे नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक रुग्ण निवेदन करतील अथवा गैरहजर राहतील त्यांना रुग्णनिवेदनाच्या तारखेपासून स्थित कार्यमुक्त (Stand relieved) करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजावावा.

१०. उपरोक्त घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकात हजर झालेल्या नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांची नांवे व त्यांच्या घटकातून बदली ठिकाणी कार्यमुक्त केलेल्या नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांची नावे हजर झालेल्या / कार्यमुक्त केलेल्या दिनांकासह या कार्यालयास कळवावीत. जे नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक बदली ठिकाणी कार्यमुक्त करुनही अद्याप हजर झालेले नाहीत त्यांचा कार्यमुक्त केल्याचा दिनांक या कार्यालयास कळवून त्यांच्याविरुध्द घटक प्रमुखांनी या कार्यालयाचे क्र.पोमसं/३/५५०७/०६/९७, दि.१३/०२/१९९७ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे शिस्तभंगविषयक कार्यवाही तातडीने सुरु करावी. सदरची माहिती या कार्यालयातील लक्षवेध:- कार्यासन अधिकारी, का.क्र. ४ यांना ई-मेलद्वारे [desk4.dgoffice@mahapolice.gov.in] पाठवावी.

**प्रत सविनय सादर,**

मा.मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-३२.

**(लक्षवेध :-** कक्ष अधिकारी, पोल-५ब)

महालेखाकार-०१, महाराष्ट्र राज्य, मुंबई / महालेखाकार-०२, महाराष्ट्र राज्य, नागपूर.

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी,**

कार्यालय अधीक्षक, का. क्र. ३ / ९ / ११ / ३६ व ४० (पोमसं कार्यालय).

**प्रत,**

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोमंस., कार्यालय, मुंबई.

२/- यांनी सदरचे आदेश लोकसभा निवडणुक - २०२४ च्या अनुषंगाने नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक यांचे बदली आदेश (Transfer order of Unamrmed Police for Loksabha - २०२४) या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर ०१ महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.